सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

Tel. No.: 022-22620332
Email : pressroom.mum@mahapolice.gov.in

Government of Maharashtra
**Police Department**
Office of the Commissioner of Police,
Dr. D.N. Road, Mumbai-400001.

---

O.W.No. 479 / 2021 Date :- 02 /10/2021

## प्रेस नोट

## वडाळा टी टी पोलीस ठाणे – खून

दि. ०१/१०/२०२१ रोजी १७:०० वा. चे सुमारास बगळा गार्डनमध्ये नाल्याच्या बाजुला, पुर्व द्रुतगती मार्ग पुलाच्या खाली, वडाळा (पुर्व), मुंबई याठिकाणी इसम नामे मोहम्मद रफिक अन्सारी व त्याचा मित्र नामे रहीस अब्बुखान हे दोघे गप्पा करित असतांना यातील अटक आरोपी हा त्याठिकाणी आला व रफिक बसलेल्या ठिकाणाजवळ उभा राहून लघवी करू लागला त्यावेळी इसम मोहम्मद रफिक अन्सारी याने त्यास दुसरीकडे जाण्यास सांगितले असता त्याचा राग येवून आरोपीताने रफिक अन्सारी यास शिवीगाळ करून हाताने तोंडावर ठोसे मारून त्याचा गळा दाबून छातीत चाकू खुपसून त्यास जिवे ठार मारले. म्हणून फिर्यादी श्री. आत्माराम तुकाराम कदम, वय ५३ वर्षे, धंदा नोकरी यांनी सरकारतर्फे दिलेल्या फिर्यादीवरून गु.र.क्र. ३३६/२०२१ कलम ३०२ भा.दं.वि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

Scanned with CamScanner